# भारताच्या इंजिनिअरिंगमध्ये ‘डब्ल्युआयटी’ सर्वश्रेष्ठ

## ‘एआयसीटीई-सीआयआय’ च्या २०१३ सर्वेक्षणाचा अहवाल



मानचिन्ह

सोलापूर(प्रतिनिधी)

बदलत्या शिक्षण प्रवाहाला साद घालत रोजगार निर्मितीसह सक्षम शिक्षणाला प्राधान्य देणे हे सामाजिक हिताचे ठरते. इंजिनिअरिंगची स्टडी करणाऱ्या विद्यार्थ्यांना सिलॅबसच्या चौकटीत अडकता येत नाही. विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला आणि त्या गुणकौशल्यांना स्वतंत्र आकाश मिळवून देणारे अनेक उद्यमशील उपक्रम राबविणे आवश्यक असते. त्याशिवाय जागतिक स्पर्धेत टिकणे शक्य होत नाही. अशा व्यापक अर्थाने जागतिक शिक्षणाच्या मूल्यमापनाची बरोबरी करणाऱ्या भारतातील मोजक्या इन्स्टिट्यूटमध्ये सोलापूरच्या ‘वालचंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी’ला मानांकन प्राप्त झाले असून ‘एआयसीटीई-सीआयआय’ च्या २०१३ च्या सर्वेक्षण २०१३ मध्ये सिव्हिल इंजिनिअरिंग विभागास प्रथम क्रमांक मिळाले आहे.



डॉ.रणजीत गांधी

देशभरातील तंत्रशिक्षण महाविद्यालयांतून दिले जाणारे शिक्षण उद्योजकांना किती प्रमाणात पोषक आहे, त्याचे मूल्यमापन करण्यासाठी नवी दिल्ली येथील ‘ऑल इंडिया कौन्सिल फॉर टेक्निकल एज्युकेशन’ (एआयटीसीई) आणि ‘कॉन्फेडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्रीज’ (सीआयआय) यांच्या संयुक्त विद्यमाने ऑक्टोबर २०१३ मध्ये सर्वेक्षण करण्यात आले. भारतातील १ हजार ५० इन्स्टिट्यूटनी त्यामध्ये सहभाग नोंदविला. त्यामध्ये ‘डब्ल्यूआयटी’ सर्वश्रेष्ठ ठरले असून, सिव्हिल इंजिनिअरिंग या विभागाने ‘बेस्ट इंडस्ट्रिज-लिंक्ड इन्स्टिट्यूट’ हे देशातील अत्यंत प्रतिष्ठेचे मानले जाणाऱ्या पहिल्या क्रमांकाचे ॲवार्ड पटकावल्याने अभियांत्रिकी शिक्षणाच्या केंद्रस्थानी सोलापूर हे पुन्हा एकदा देशापुढे अधोरेखित झाले आहे. ही बाब केवळ सोलापूरसाठी नव्हे तर महाराष्ट्राला अभिमानदायक ठरणारी आहे.

अभियांत्रिकी अभ्यासक्रमास सर्वांगाने परिपूर्ण करण्यासाठी विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीला वाव देणे, अशा साधक गोष्टींचा विचार करून, त्यांच्या बुध्दीचा उपयोग उद्योगांना नेमकेपणाने करून घेता आला पाहिजे, अशा साधक गोष्टींचा विचार करून ‘एआयटीसीई’ आणि ‘सीआयआय’ या दोन्ही संस्थांनी एकत्रित येऊन राबविलेला एक आदर्श उपक्रम आहे. उद्योग आणि शिक्षण या दोन्हीमधील परस्परसंबंध अधिक दृढ करणे हा या सर्वेक्षणाचा महत्त्वाचा उद्देश आहे. देशभरातील केवळ ३० टक्के अभियांत्रिकी महाविद्यालयांनी प्रतिष्ठेच्या मानल्या जाणाऱ्या या सर्वेक्षणाला सामोरे जाण्याचे धारिष्ट दाखविले आहे.

अभियांत्रिकी शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना व शिक्षक वर्गाला औद्योगिक घटकाचे प्रात्यक्षिक ज्ञान देणारे विविध उपक्रम, महाविद्यालयीन सुट्टीच्या काळात औद्योगिक प्रशिक्षणार्थीसाठी राबविलेले कार्यक्रम, प्राध्यापकांचा शैक्षणिक दर्जा व त्यांनी उद्योजकांसाठी केलेले मार्गदर्शन, महाविद्यालयातील साधनशुचिता, पायाभूत घटक, महाविद्यालयाकडून उद्योगाला दिल्या जाणाऱ्या योगदानाची माहिती, उद्योजकांसाठी चर्चासत्र, परिसंवादासारख्या कार्यक्रमांचे नियोजन, उद्योगातील आव्हाने समजून घेऊन त्यात सातत्याने सुधारणा सुचविण्यासाठी औद्योगिक जगताशी कायम संलग्नित राहणे, अशा माहितीचे संकलन ‘एआयसीटीई’ने केले. त्या सगळ्या निकषांत डब्ल्युआयटी भारतात सर्वश्रेष्ठ ठरले आहे. या ठिकाणी शिकविल्या जाणाऱ्या ‘कॉम्प्युटर सायन्स इंजिनिअरिंग, इन्फॉरमेशन टेक्नॉलॉजी, इलेक्ट्रॉनिक्स इंजिनिअरिंग, इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग, सिव्हिल इंजिनिअरिंग आणि मेकॅनिकल इंजिनिअरिंग’ या सगळ्या विषयांना ‘एआयसीटीई-सीआयआय’चे(पान २ वर)